डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# कृषि संशोधन केंद्र, शिरगाव–४१५ ६२९,

ता. जि. रत्नागिरी, (महाराष्ट्र)

डॉ. व्ही. व्ही. दळवी,
प्रभारी अधिकारी

फॅक्स /फोन नं : कार्यालय– ८२६२८३०२२७
ईमेल : vjy-dlv@yahoo.co.in
arsshirgaon@rediffmail.com

जा.क्र. कृसंके/रत्ना/जाहिरात/330/२०२३ दि. 9४/08/2023

प्रति,

**मा. प्रभारी अधिकारी**
ARIS & LAN,
डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**विषय :– हापूस आंबा बागेची मेहनतीवर एका हंगामासाठी (२०२३–२४) विक्री निविदा विद्यापिठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत .....**

वरील विषयास अनुसरून आपणास सादर करण्यात येते कि, कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी येथील हापूस आंबा बागेची मेहनतीवर एका हंगामासाठी (२०२३–२४) विक्री निविदा आपल्या विद्यापिठाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. व्ही. व्ही. दळवी)

**सोबत** : वरीलप्रमाणे

प्रत, मा. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांना माहितीसाठी सविनय सादर.

निविदा सुचना

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

# कृषि संशोधन केद्र, शिरगांव–रत्नागिरी

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी येथील आंबा बाग (४० हापूस कलमे) एका हंगामासाठी (२०२३–२४) मेहनतीवर देणेसाठी (सुट्टीचे दिवस सोडून) कार्यालयीन वेळेमध्ये सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सर्व सिलबंद निविदा पत्रिका रत्नागिरी येथे कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी याचे कार्यालयात स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास अंतिम तारखेस निविदा धारकासमोर/प्रतिनिधिसमोर निविदा उघडण्यात येतील.

| अ क्र | तपशील | इसाऱ्याची रक्कम | निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी | निविदा सादर करावयाची अंतीम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा पत्रिकेची किंमत | आंबा कराराचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी येथील प्रक्षेत्रावर आंबा बाग मेहनतीवर एका हंगामासाठी देणे. | रू. १०,०००/– | दिनांक १६.०८.२०२३ ते ०४.०९.२०२३ | दिनांक ०४.०९.२०२३ १३.०० वाजेपर्यंत | दिनांक ०५.०९.२०२३ १५.०० वाजता | रू. ५००/– | माहे ०५ सप्टेंबर, २०२३ ते ३१ मे, २०२४ |

सविस्तर निविदा सुचना कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी, यांच्या कार्यालयात कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध होतील.

(सही)

**प्रभारी अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
शिरगांव, रत्नागिरी ४१५ ६२९

जा.क्र. कृसंकेशि/आंबा टेंडर/330 /२०२३
कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी
दिनांक – 14/08/2023

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

**कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी,**

**हापूस आंबा बागेची मेहनतीवर एका हंगामासाठी देणे बाबत अटी/शर्ती**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत कृषि संशोधन केंद्र, शिरगांव (रत्नागिरी) येथील चालू हंगामातील (२०२३-२४) हापूस आंबा कलमाची बाग (४० हापूस कलमे) मेहनतीवर एका हंगामासाठी लिलाव पध्दतीने द्यावयाची आहे. त्यासाठी मोहोरबंद निविदा दि. ०४.०९.२०२३ दुपारी १३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत लिलावासंबंधीच्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. | या संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील आंबा बाग मेहनतीवर देणेसाठी एकत्रित रू. १०,०००/- इतकी अनामत रक्कम ठेवण्यात आली आहे. अनामत रक्कम धनाकर्षाने (डी. डी.) लखोटयातून स्विकारण्यात येईल. धनाकर्ष **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ** यांचे नावे **रत्नागिरी शाखेवरील** देय असावा. |
| २. | निविदा द्वि लखोटा पध्दतीने (दोन लखोटा पध्दत) स्विकारण्यात येईल लखोटा क्र. १ मध्ये अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डी. डी.) व जिल्हा बाजार समितीचा नोंदणी परवाना सादर करण्यात यावा अथवा त्याबाबतच्या जबाबदारीचे हमीपत्र व लखोटा क्र. २ मध्ये निविदा दराचा फॉर्म सादर करण्यात यावा. लखोटा क्र. १ मधील सर्व कागदपत्रांची पुर्तता झाल्यावरच लखोटा क्र. २ उघडण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. |
| ३. | मोहरबंद निविदांच्या पाकीटांवर **'सन २०२३-२४ मधील एका हंगामासाठी आंबा बाग मेहनतीवर देणे'** असे नमुद करावे आणि त्याखाली कार्यालयाचा पत्ता असावा व पाकिटाच्या मागील बाजूस निविदाधारकाचे संपूर्ण नांव व पत्ता असावा. |
| ४. | निविदा भरलेल्या रक्कमे व्यतिरिक्त इतर कर असल्यास ते संबंधित निविदाधारकास भरावे लागतील. निविदा रक्कमेशी त्याचा संबंध राहणार नाही. |
| ५. | निविदा उघडल्यानंतर सर्वात जास्त दराने देकार सादर करणाऱ्या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या निविदाधारकांची अनामत रक्कम राखून ठेवण्यात येईल. उर्वरित अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर होईल त्यांनी लिलावात मंजूर झालेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम भरल्यानंतर उर्वरीत ठेकेदारांची रक्कम परत करण्यात येईल. |
| ६. | मंजूर निविदाधारकाने लिलाव नाकारल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ७. | ज्याची निविदा स्विकारली जाईल, त्यांना रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल. स्टॅम्प पेपरचा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे. |
| ८. | स्वीकृत निविदेत नमूद केलेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम २४ तासांच्या आत रोखीने कार्यालयात भरणा करावी लागेल. उरलेली ५० टक्के रक्कम ४ दिवसांच्या आत कार्यालयात रोखीने भरावी लागेल. |
| ९. | स्वीकृत निविदाधारकाने हापूस बागेची सर्व निगा, फवारण्या इत्यादि करून फळे घ्यावयाची आहेत. बागेची निगा करताना व फळे तोडताना झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित निविदाधारकास जबाबदार धरले जाईल आणि होणारे नुकसान भरुन द्यावे लागेल. |
| १०. | निविदा पाठवितांना निविदाधारकाने घातलेली कोणतीही अट स्विकारली जाणार नाही व त्यास निविदा प्रक्रियेतून रद्द ठरविण्यात येईल. |
| ११. | निविदा मंजूर झाल्यापासून आंबा कलमाची सर्व निगा निविदाधारकाने करावयाची आहे. |
| १२. | लिलावासाठी असलेली हापूस आंब्याची झाडे कार्यालयीन वेळेत सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० पर्यंत प्रत्यक्ष पाहता येतील. |
| १३. | निविदा मंजूर झाल्यानंतर आग, वादळ, पाऊस आणि चोरी इत्यादी कारणांमुळे होणाऱ्या फळांच्या नुकसानीस |

| | |
|---|---|
| | विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. |
| १४. | निविदा रविवार व सुट्टींच्या दिवसाखेरीज सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० या वेळेत स्विकारण्यात येतील. |
| १५. | निविदा स्विकारण्याची **अंतिम मुदत दि. ०४.०९.२०२३ रोजी १३.०० वाजेपर्यंत** राहील आणि निविदा **दि. ०५.०९.२०२३ रोजी १५.००** वाजता निविदाधारकांसमोर उघडण्यात येतील. विहीत वेळेनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. |
| १६. | निविदेमध्ये रक्कमेच्या आकडयात खाडाखोड, गिरविणे इत्यादी गोष्टी असल्यास त्यावर निविदाधारकाची संपूर्ण सही असणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल. |
| १७. | उपरोक्त हापूस आंबा बाग हि कमिटीने ठरविलेल्या किंमती पेक्षा कमी किमतीच्या निविदा आल्यास निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा हक्क समितीकडे राहील. |
| १८. | कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खालील सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे. |
| १९. | मोहोरबंद निविदेव्दारे वाजवी किंमत न आल्यास निविदा उघडल्यानंतर लगेचच उपस्थित निविदाधारकांसमोर सदर बागेतील हापूस आंबा कलमांचा मेहनतीवर एका हंगामासाठी (२०२३–२४) विक्रीसाठी बोलीव्दारे लिलाव पध्दतीने विकण्याचा हक्क राखून ठेवला आहे. तोंडी बोलीव्दारे लिलावात फक्त ज्यांनी अनामत रक्कम भरुन निविदा भरल्या आहेत त्यांनाच भाग घेता येईल. |

दिनांक :–

**प्रभारी अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
शिरगांव, रत्नागिरी ४१५ ६२९

**DIRECTORATE OF RESEARCH**
**Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth**
Dapoli 415 712, Dist. Ratnagiri (M.S.)
Phone : 02358-282417, Fax 282417

E-mail : dorbskkv@rediffmail.com

**संशोधन संचालनालय**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**
दापोली ४१५ ७१२,जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)
दूरध्वनी ०२३५८-२८२४१७, फॅक्स २८२४१७

**Dr. Y. P. Khandetode**
**Director of Research**

डॉ. वाय. पी. खंडेतोड
संशोधन संचालक

जा.क्र. डॉ.बासाकाकृवि/संशो-३/1520/२०२३ दिनांक: 11 AUG 2023

प्रति,

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र, शिरगांव,
रत्नागिरी.

विषय : कृषि संशोधन केंद्र, शिरगाव येथील आंबा बागांची एक वर्षासाठी (सन २०२३–२४ हंगाम) मेहनतीवर निविदेद्वारे विक्री करणेबाबत.....

संदर्भ : जा.क्र.कृसंकेशि/आंबालिलाव/१८२/२०२३, दि. १४/०६/२०२३

कृषि संशोधन केंद्र, शिरगाव येथे संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील आंबा बागांच्या एक वर्षासाठी (सन २०२३–२४ हंगाम) मेहनतीवर जाहीर निविदेद्वारे विक्री करण्यास व त्या करिता खालील तक्त्यात नमुद केलेल्या गठीत समितीस व या संबधीची निविदा २१ दिवस मुदतीच्या जाहीर निविदेद्वारे सुचना स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यास मा. कुलगुरू महोदय यांची प्रशासकिय मंजूरी कळविण्यात येत आहे.

जाहीर निविदेद्वारे विक्री करण्यास गठीत समिती:

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. के. व्ही. मालशे, कृषि विद्यावेत्ता, प्रानासंके, भाटये | अध्यक्ष |
| २ | डॉ. व्ही. व्ही. दळवी, प्रभारी अधिकारी | सदस्य |
| ३ | डॉ. एन. जी. सोनोने, कृषि पर्यवेक्षक | सदस्य |
| ४ | श्री. सचिन जाधव, लेखा परिक्षण अधिकारी | सदस्य |
| ५ | श्री. व्ही. जी. सावंत, वरिष्ठ लिपीक | सदस्य सचिव |

संशोधन संचालक

प्रत माहितीसाठी :

सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, जि. सिंधुदूर्ग.